**MHPU200020242014**

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २२/१२/२०१४ |
| नोंदणी तारीख | : | २२/१२/२०१४ |
| निकाली तारीख | : | ०२/०७/२०२६ |

| | | व. | म. | दि. |
|---|---|---|---|---|
| कालावधी | : | ११ | ०६ | १० |

| | |
|---|---|
| **घोडनदी, ता. शिरुर, जि. पुणे येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात** | |
| **पिठासीन अधिकारी चंद्रमोहन मो. खारकर** | |
| **न्यायनिर्णयाची तारीख** | ०२/०७/२०२६. |
| **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक** | ५४२/२०१४. |
| **निशाणी क्रमांक** | १८. |
| **प्रथम खबर क्रमांक** | ४००/२०१४<br>भारतीय दंड संहितेचे कलम २७९, ३३७,३३८, ३०४–(अ) व ४२७ आणि मोटर वाहन कायद्याचे कलम १८४, १३४(१)(ब) अंतर्गत. |
| **पोलीस ठाणे** | शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे. |

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | | **महाराष्ट्र शासन** तर्फे<br>पोलिस ठाणे अधिकारी,<br>शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे. |
| अभियोग पक्षातर्फे | | **श्री. एस. एम. आरणे, विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता.** |

| | | |
|---|---|---|
| आरोपी | | **ज्ञानेश्वर भाऊसाहेब मंडलिक,**<br>वय:– ५५ वर्षे, व्यवसाय:– चालक,<br>रा. संभाजीनगर, नेवासाफाटा,<br>ता. नेवासा, जि. अहमदनगर. |
| आरोपी तर्फे | | **विद्वान वकील श्री. एस. डी. हिलाळ.** |

**भाग “ब”**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०६/१०/२०१४ |
| प्रथम खबरची तारीख | १३/१०/२०१४ |
| अंतीम आरोपपत्र दाखल केल्याची तारीख | २२/१२/२०१४ |
| दोषारोपपत्राची तारीख | १८/०३/२०१७ |
| पुरावा नोंदविणे प्रारंभ केल्याची तारीख | २७/०४/२०१७ |
| न्यायनिर्णयाची राखीव असलेली तारीख | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२/०७/२०२६ |
| गुन्हासाठी शिक्षा, असल्यास | काहीही नाही. |

**आरोपीचा तपशील.**

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जामिनाचा दिनांक | दाखल झालेले गुन्हे | दोषी किंवा निर्दोष | झालेली शिक्षा | संपरीक्षे दरम्यान आरोपीचा अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ज्ञानेश्वर भाऊसाहेब मंडलिक | ०१/११/२०१४ | ०१/११/२०१४ | भा.दं.वि. याचे कलम २७९, ३३८, ३०४–अ, ४२७ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४, १३४(१)(ब) अन्वये. | निर्दोष | निरंक | निरंक |

:: **न्या य नि र्ण य** ::

**( जाहीर दिनांक – ०२/०७/२०२६ )**

प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३३८, ३०४–अ, ४२७ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४, १३४(१)(ब) प्रमाणे संपरिक्षा करण्यात आली.

०२. **अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्तपणे खालील प्रमाणेः**

दिनांक ०६/१०/२०१४ रोजी १२.४५ वाजताचे सुमारास मौजे शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे येथे पुणे–नगर हायवे रोडवर सतरा कमान शिरुर बायपास जवळ फिर्यादी व साक्षीदार सोपान रामभाऊ तरडे हे टी.व्ही.एस. मोटारसायकल क्र.एम.एच.–१६–बी.बी.–९८६० (सदर मोटारसायकल हिस इथुन पुढे संक्षीप्तपणे ''***उपरोक्त नमुद अपघातग्रस्त मोटारसायकल***'' असे संबोधण्यात आलेले आहे) हिने सतरा कमान पुल पास करुन शिरुर बायपास जवळ आले असता शिरुरकडे वळण्यासाठी वेग कमी केला असता, आरोपीने पाठीमागुन नगर बाजुकडुन त्याचे ताब्यातील स्वीफ्ट कार क्र.एम.एच.–१७–ए.जे.–८०९१ (सदर कार हिस इथुन पुढे संक्षीप्तपणे ''***उपरोक्त नमुद अपघातग्रस्त कार***'' असे संबोधण्यात आलेले आहे) ही हयगयीने, अविचाराने, निष्काळजीपणे, रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगात चालवुन फिर्यादीचे मोटारसायकलला पाठीमागुन ठोस देवुन अपघात करुन फिर्यादीचे लहान मोठ्या दुखापतीस व मोटारसायकल वरील सोपान रामभाऊ तरडे यांना लहान मोठ्या दुखापतीस व मृत्युस कारणीभुत झाला. फिर्यादीने दिनांक १३/१०/२०१४ रोजी घटनेची फिर्याद दिली.

**०३.** फिर्यादीच्या अनुषंगाने आरोपीविरूध्द गु.र.नं.४००/२०१४ भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८, ३०४–अ, ४२७ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४, १३४(१)(ब) प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला. गुन्हयाचा तपास सहा. पोलीस उपनिरीक्षक श्री. डी.आर. पाटील, यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आलेनंतर आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर समन्स काढण्यात आले. आरोपी समन्स स्विकारून न्यायालयात हजर झाला. आरोपीविरूध्द निशाणी ५ लगत भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८, ३०४–अ, ४२७ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४, १३४(१)(ब) प्रमाणे दोषारोप नोंदवण्यात आला. सदर दोषारोप आरोपीस त्याचे मातृभाषेत वाचून दाखविण्यात आले. आरोपीने सदरचे दोषारोप नाकबूल केले व संपरिक्षेस जाण्याची तयारी दर्शविली.

**०५.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी खालील साक्षीदार तपासले.

| भाग “क” | | | |
|---|---|---|---|
| **अ. अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदाराची यादी** | | | |
| **अ. क्र.** | **नाव** | **साक्षीदाराचे स्वरुप** | **नि. क्र.** |
| अ.सा.क्र. १ | रमेश पांडुरंग चौधरी | पंच साक्षीदार | ०९ |

| ब. बचाव पक्षाने तपासलेल्या साक्षीदाराची यादी | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **नाव** | **साक्षीदाराचे स्वरुप** | **नि. क्र.** |
| **:: नि रं क ::** | | | |

| क. न्यायालयाने स्वतः तपासलेल्या साक्षीदाराची यादी | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **नाव** | **साक्षीदाराचे स्वरुप** | **नि. क्र.** |
| **:: नि रं क ::** | | | |

**०६.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी खालील दस्ताऐवजावर आपली भिस्त ठेवली.

| भाग “क” | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्षाने सादर केलेल्या दस्ताऐवजांची यादी** | | |
| **अ. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
| **:: नि रं क ::** | | |

**०७.** बचाव पक्षाने खालील दस्ताऐवजावर आपली भिस्त ठेवली.

| भाग “क” | | |
|---|---|---|
| **बचाव पक्षाने सादर केलेल्या दस्ताऐवजांची यादी** | | |
| **अ. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
| **:: नि रं क ::** | | |

**०८.** न्यायालयाने स्वतः खालील दस्ताऐवजावर दाखल केले.

| भाग “क” |
|---|

| न्यायालयाने स्वतः दाखल केलेल्या दस्तांऐवजाची यादी | | |
|---|---|---|
| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
| :: निरंक :: | | |

०९. निशाणी १ वरील आदेशान्वये अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

१०. आरोपीविरूध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेख सदरी न मिळुन आल्याने आरोपीचे फौजदारी प्रकिया संहिता, १९७३, कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन नोंदवण्यात आलेले नाही.

११. युक्तीवाद ऐकला. खालील निर्धारण बिंदु माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसे सहीत खालील प्रमाणे नोंदवितो.

| अ.क्र. | निर्धारण बिंदु | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दि. ०६/१०/२०१४ रोजी १२.४५ वाजताच्या सुमारास मौजे शिरुर, सतरा कमान शिरुर बायपास जवळ आरोपीने त्याचे ताब्यातील उपरोक्त नमुद अपघातग्रस्त कार ही मानवी जिवित धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने सार्वजनिक रस्त्यावर चालवत असताना आढळुन आला काय ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ०२. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, वर नमुद तारीख, ठिकाण व वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील अपघातग्रस्त कार ही हयगयीने, अविचाराने, रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगात चालवुन उपरोक्त नमुद अपघातग्रस्त मोटारसायकल वरील चालक व सोपान रामभाऊ तरडे यांना किरकोळ जखमी केले काय? | **नकारार्थी** |
| ०३. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, वर नमुद तारीख, ठिकाण व वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील अपघातग्रस्त कार ही हयगयीने, अविचाराने, रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगात चालवुन उपरोक्त नमुद अपघातग्रस्त मोटारसायकल वरील चालक व सोपान रामभाऊ तरडे यांना गंभीर जखमी केले काय? | **नकारार्थी** |
| ०४. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, वर नमुद तारीख, ठिकाण व वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त नमुद अपघातग्रस्त कार ही हयगयीने निष्काळजीपणे, रदहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगात चालवुन फिर्यादी यांचे मोटारसायकलला पाठीमागुन धडक देवुन उपरोक्त नमुद अपघातग्रस्त मोटारसायकल वरील सोपान रामभाऊ तरडे यांचे मृत्युस कारणीभुत ठरला काय ? | **नकारार्थी** |
| ०५. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, वर नमुद तारीख, ठिकाण व वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त नमुद अपघातग्रसत कार ही हयगयीने, निष्काळजीपणे, रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन चालवुन अपघात केला व उपरोक्त नमद अपघातग्रस्त दोन्ही वाहनांचे नुकसानीस कारणीभुत झाला काय? | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| ०६. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, वर नमुद वेळी, दिवशी व ठिकाणी आरोपीने आपल्या ताब्यातील उपरोक्त नमुद अपघातग्रस्त कार ही मानवी जिवीतास किंवा इतरांची व्यक्तीगत सुरक्षीतता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे, हयगयीने व भरवेगाने चालविली काय ? | नकारार्थी |
| ०७. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, वर नमुद तारीख, ठिकाण व वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील अपघातग्रस्त कार ही हयगयीने, अविचाराने, रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगात चालवुन उपरोक्त नमुद अपघातग्रस्त मोटारसायकल हिस ठोस मारुन अपघात केला व अपघातातील जखमी व्यक्तिंना आवश्यक वैद्यकीय मदत मिळवुन न देता पळुन गेला काय? | नकारार्थी |
| ०८. | कोणता गुन्हा सिध्द होतो ? | नकारार्थी |
| ०९. | अंतिम आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता. |

:: कारणमिमांसा ::

**निर्धारण बिंदु क्रं १ ते ७ करीता:**

१२. निर्धारण बिंदु क्र. १ ते ७ हे समान तथ्यांवरती व पुराव्यावरती आधारीत असल्यामुळे त्यांचे विवेचन मी एकत्रीतरित्या करीत आहे.

१३. आरोपीविरुध्द ठेवलेले आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ नामे रमेश पांडुरंग चौधरी या केवळ एक साक्षीदाराची साक्ष तपासण्यात

आलेली आहे. सदर साक्षीदार हे घटनास्थळ तथा जप्ती पंच साक्षीदार असुन सदर साक्षीदार यांनी अभियोगपक्षाचे कथनांस पुरक व सुसंगत अशी साक्ष दिलेली नाही. अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयीन परवानगीने सदर साक्षीदार यांचा उलटतपास घेतला. परंतु, उलटतपासतपासादरम्यान देखील सदर दोन्ही साक्षीदार यांनी अभियोगपक्षास सहकार्य होईल असे काहीही कथन केलेले नाही. अभियोगपक्षातर्फे तपासलेले सदर पंच साक्षीदार यांचा मौखिक पुरावा हा विश्वसार्ह वाटत नाही. अभियोगपक्षास पुरेशी संधी देवुन देखील फिर्यादी, तपासी अधिकारी, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व इतर स्वतंत्र साक्षीदार यांनी साक्ष नोंदविण्यात असमर्थ ठरला आहे.

१४. प्रस्तुत प्रकरणामध्ये घटनेवेळी आरोपीनेच अपघात केला हे शाबीत करणे अभियोगपक्षावर बंधनकारक आहे. सदर प्रकरणाचे अवलोकन केले असता, अभियोगपक्षाने आरोपीनेच हा गुन्हा केला हे दर्शविणारा स्पष्ट व निर्विवाद पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराची साक्ष आरोपीला दोषी धरण्याइतपत पुरेशी नाही. तसेच, अभियोगपक्षाच्या पुराव्यावरुन आरोपीनेच गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिध्द करु शकलेला नाही. अभियोग पक्षाने आरोपीविरूध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३३८, ३०४–अ, ४२७ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४, १३४(१)(ब) प्रमाणेचा गुन्हा सिध्द करण्यासाठी आवश्यक घटकांची पूर्तता केलेली नाही व सदरचा गुन्हा निसंशयरित्या आरोपीनेच केला ही बाब सिध्द केलेली नाही. **सबब मी निर्धारण बिंदु १ ते ७ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.**

**निर्धारण बिंदु क्रं. ८ करीता**:

**१५.** आरोपीविरूध्द कोणताही गुन्हा सिध्द होत नाही. सबब निर्धारण बिंदु क्र. १ ते ७ प्रमाणेचा गुन्हा सिध्द होत नाही. म्हणुन मी निर्धारण बिंदु क्र.८ चे उत्तर नकारार्थी नोंदवले आहे. करीता आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. **सबब निर्धारण बिंदु क्र.९ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.**

| :: **आ दे श** :: | |
|---|---|
| **०१.** | आरोपीची भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३३७, ३०४–अ, ४२७ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४, १३४१३४(१)(ब) प्रमाणे दंडनीय गुन्हयातून फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| **०२.** | आरोपीचा सध्याचा जामीन व जातमुचलका रद्द करण्यात येतो. |
| **०३.** | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७ (अ) प्रमाणे पूर्तता करावी. |
| **०४.** | प्रस्तुत प्रकरणात जप्त करण्यात आलेली वाहने ही मुळ मालकास परत केली नसल्यास योग्य तपासणी करुन मुळ मालकास परत करण्यात यावे. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.) |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by CHANDRAMOHAN MOHAN KHARKAR
Date: 2026.07.02 17:14:12 +0530

दिनांक: ०२/०७/२०२६.
स्थळ : घोडनदी.

**( चंद्रमोहन मो. खारकर )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
घाडनदी, ता. शिरुर, जि. पुणे.

शेरा -

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. न्यायनिर्णय फाईल मधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द न शब्द सारखा आहे.

कोर्टाचे नाव – मे. सी.एम. खारकर
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, शिरुर जि.पुणे.

लघुलेखकाचे नाव. - व्ही. एम. घुंगरड

निकालाची तारीख – ०२/०७/२०२६

निकालपत्र सही केल्याची तारीख – ०२/०७/२०२६

निकालपत्र अपलोड केल्याची तारीख – ०२/०७/२०२६